सन २०१७ चा पी.एल.आर. दर निश्चित करणेबाबत.

शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या किंमतीवर आकारावयाच्या व्याजाच्या दराबाबत व भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीच्या वार्षिक भाडेपट्ट्याच्या दराबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- पीएलआर-२०१६/प्र.क्र.२६/ज-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-
१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएमडी १०९२/प्र.क्र.८४/ज-१, दिनांक ३०.६.१९९२
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन १०९७/२२१४/प्र.क्र.९३/ज-१, दिनांक ८.७.१९९९
३) शाखा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, स्टेट बँक भवन, मुंबई यांचे पत्र. दिनांक १.२.२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता - १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम- १९७१ मधील तरतूदीनुसार शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, अशा जमिनींच्या कब्जेहक्काच्या रकमेवर त्या जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यापासून ते अंतिम कब्जेहक्काची किंमत निश्चित करुन तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत १५ % दराने व्याज आकारण्याबाबत. तसेच, शासकिय जमिनीच्या भूईभाड्याचा दर संपूर्ण बाजारमुल्याच्या १५ % आकारण्याबाबत उक्त शासन निर्णय दि. ३०.६.१९९२ अन्वये तरतुद करण्यात आली होती. या दराबाबत शासनाकडून पुनर्विचार करुन व्याजाच्या व भूईभाड्याच्या उक्त दरामध्ये सुधारणा करुन शासन निर्णय दि. ८.०७.१९९९ अन्वये सुधारित आदेश देऊन, त्यानुसार पुढील तरतुद करण्यात आली,

"आगाऊ ताबा दिलेल्या शासकीय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा. हा दर दरवर्षी दि. ०१ जानेवारीच्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" च्या दराइतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असावा. भारतीय स्टेट बँकेचा "प्राईम लेंडींग रेट" मध्येच बदलला, तरी पूर्वीचाच दर त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असेल व वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास पुन्हा सुधारण्यात यावा."

त्यानुसार दरवर्षी भारतीय स्टेट बँकेकडून त्यावर्षीचे ०१ जानेवारी रोजी असलेला"प्राईम लेंडींग रेट" मागविण्यात येऊन, त्यानुसार परिपत्रक काढून क्षेत्रीय यंत्रणांना कळविण्यात येते. सन २०१७ या संपुर्ण वर्षासाठी आकारावयाच्या उक्त नमूद व्याजाचा दर आणि भूईभाड्याचा दर निश्चित करण्यासाठी भारतीय स्टेट बँकेकडून दि. ०१ जानेवारी २०१७ चा "प्राईम लेंडींग रेट" मागविण्यात आला असता, स्टेट बँकेचे "प्राईम लेंडींग रेट" ९.१०% (P.L.R.) असल्याने सदर ९.१०% दर क्षेत्रीय यंत्रणांना कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर तथा भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीकरीता आकारावयाच्या वार्षिक भुईभाड्याचा दर हा प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम ठेवावा असे संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आलेले आहे. सबब, भारतीय स्टेट बँकेकडून कळविण्यात आलेला दि. ०१ जानेवारी २०१७ रोजीचा ९.१०% "पीएलआर" दर हा सन २०१७ या संपूर्ण वर्षासाठी, शासकिय जमीन कब्जेहक्काच्या रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर /तथा भुईभाड्याचा दर म्हणून आकारण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६७/अर्थोपाय, दिनांक ०८.०८.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसुरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१५१३५५१५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c61495ae8b4592f8dcc5b8a851a8, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2017.11.16 16:54:22 +05'30'

(राजेंद्र क्षीरसागर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर.
१०. सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी.
११. वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
१२.सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१३. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. "ज" समुहातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-०५.
१५. कक्ष अधिकारी (ल-१), संगणक शाखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-०५.
१६. निवडनस्ती कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.